F/C

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य.

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४८६
ई-मेल—desk18@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**स्पीडपोस्ट / ईमेलद्वारे -**

क्र.:-१८/तंशिसं/डीबीटी/विकाप/२०२३-२४/२४२
दिनांक :- २० / १० / २०२३

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर

विषय :- **शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करिता संस्थांनी महाडीबीटी पोर्टलवरील संस्थेची माहिती** ( Institute Profile ) **अद्ययावत करण्याबाबत ....**

संदर्भ :- महाआयटी यांचेकडून दि.०४/१०/२०२३ रोजी ईमेलद्वारे प्राप्त संदेश.

सन २०१८-१९ या वर्षापासून माहिती व तंत्रज्ञान संचालनालय, मंत्रालय, मुंबई यांच्याकडून महाराष्ट्र शासनाच्या विविध योजनांकरिता बनविण्यात आलेल्या **महाडीबीटी पोर्टलद्वारे** ( संकेतस्थळ- https://mahadbt.maharashtra.gov.in) तंत्रशिक्षण संचालनालयाकडून खालील योजना राबविण्यात येतात.

अ. राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना
ब. डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाहभत्ता योजना
क. उच्च व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेणाऱ्या राज्यातील अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांकरिता शिष्यवृत्ती योजना

**शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करिता,** महाडीबीटी पोर्टल नोंदणीकृत असणाऱ्या (Registered Institute) संस्थांना, संस्थांची माहिती (Institute Profile) अद्ययावत करण्यासाठी डीबीटी पोर्टल **दि.०३.१०.२०२३ पासून** महाआयटी यांचेकडून सुरु करण्यात आलेले असून सोबत महाआयटी यांच्या संदर्भीय ईमेलची प्रत जोडली आहे, त्याचे अवलोकन करावे. तसेच, याबाबत सर्व विभागीय कार्यालयांनी त्यांच्या अधिनस्त येणाऱ्या सर्व संस्थांना खालीलप्रमाणे सुचित करावे.

१. संस्थांनी, डीबीटी पोर्टलचा लॉगीन आयडी व पासवर्डचा वापर करुन संस्था माहिती अंतर्गत (Institute Profile) असलेली सर्व माहिती जसे शैक्षणिक शुल्क, अभ्यासक्रमाचा तपशील इत्यादी (For example: Fee details, Course Details etc.) **अचूक भरुन** पुढील कार्यवाहीसाठी पाठवावी. ( तसेच **शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून,** महाआयटीच्या ईमेलमध्ये नमूद केल्याप्रमाणे, **** For professional unaided courses approved by the Fee Regulating Authority (FRA), starting from the new academic year 2023-2024, institutes will no longer be required to manually input Tuition Fee and Development Fee details. Instead, these details will be automatically retrieved through API integration.**)

२. संस्थांनी, सदर माहिती सक्षम प्राधिकरणाकडून मंजूर करुन घ्यावी, जेणेकरुन डीबीटी पोर्टलवर संस्थांना त्यांच्या लॉगीनमध्ये प्राप्त झालेले, विद्यार्थ्यांचे अर्ज तपासणी करुन पुढील कार्यवाहीसाठी पाठविता येतील. [ तसेच, शैक्षणिक शुल्क मंजूरी प्रलंबित ( Fees Not Approved ) या कारणास्तव जर संस्थांना विद्यार्थ्यांचे अर्ज तपासणी करुन पुढील कार्यवाहीसाठी पाठविता आले नाही तर याबाबतची सर्वस्वी जबाबदारी संस्थाप्रमुख यांची राहील याची नोंद घ्यावी. ]

३. डीबीटी पोर्टलवर **संस्थेकडून भरण्यात आलेले** व मंजूरीसाठी पाठविण्यात आलेले **वर्षनिहाय शुल्क डीबीटी पोर्टलवर एकदा मंजूर करण्यात आले तर ते दुरुस्त करता येणार नाही** व मंजूर झालेल्या शुल्कानुसार त्या त्या संबंधित योजनांचा लागू असलेला लाभ देण्यात येतो या कारणास्तव डीबीटी पोर्टलवर संस्थांनी घटकनिहाय शुल्क **अचूक भरुन मंजूरीसाठी पाठवावे याची संस्थांनी नोंद घ्यावी.**

तसेच याबाबत सर्व विभागीय कार्यालयांना कळविण्यात येते की, महाडीबीटी पोर्टलवर संस्थांकडून ऑनलाईनरित्या शुल्क घटकांतर्गत भरण्यात आलेले व मंजूरीसाठी प्राप्त होत असलेले घटकनिहाय शुल्क ( खाजगी संस्थांचे Tuition Fee & Development Fee हे FRA यांचेकडे मंजूरीसाठी जाते. ) लॉगीन आयडीद्वारे मंजूर करते वेळी अतिशय काटेकोरपणे तपासून मंजूरी द्यावी. डीबीटी पोर्टलवर मंजूरीसाठी संस्थेकडून भरण्यात आलेल्या शुल्कामध्ये काही तफावत आढळून आल्यास ते Reject करुन, शुल्कामधील तफावत दूर करून पुन्हा मंजूरीसाठी पाठविण्याबाबत संबंधित संस्थेला सूचना देण्यात यावी. जर तफावत असलेले शुल्क मंजूर करण्यात आले तर डीबीटी पोर्टलवर पुन्हा ते दुरुस्त करता येणार नाही व डीबीटी पोर्टलवर मंजूर करण्यात आलेल्या शुल्काबाबतची सर्वस्वी जबाबदारी विभागीय कार्यालयाची राहील याची नोंद घ्यावी.

( डॉ. विनोद म. मोहितकर )
संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई.

प्रत. १) मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, ४ था मजला, मुंबई-३२ यांना माहितीसाठी सविनय सादर.

२) मा. अपर मुख्य सचिव, अल्पसंख्यांक विकास विभाग, ७ वा मजला, मुंबई-३२ यांना माहितीसाठी सविनय सादर.

३) मा. सचिव, शुल्क नियामक प्राधिकरण, ३०५, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९, खेरवाडी, आलियावर जंग मार्ग, वांद्रे ( पूर्व ), मुंबई- ४०० ०५१ यांना विनंती करण्यात येते की, डीबीटी वर्क फ्लोनुसार संस्थांच्या डीबीटी पोर्टलवर प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांबाबत उचित कार्यवाही करण्यात यावी, जेणेकरुन संस्थांना विद्यार्थ्यांच्या अर्जांवरील पुढील कार्यवाही करता येईल.